झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/६६३/२०२२
दिनांक :०६/०८/२०२२.

३५१
३७५

## "झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश"
## (महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे '**उक्त अधिनियम**' असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे रावेत स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै, सि.स.नं.१३०पै, १३२पै, १३३पै, १३४पै, १३६पै, १३७पै, सेक्टर नं.२९, प्लॉ.क्र.४६ ते ५५ येथील रमाबाईनगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या ही मिळकत घोषित नसल्याचे दिसून येते. तथापि, सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.झोनिपु/०७/कावि/१२९/२०२१, दि.२६/१०/२०२१ अन्वये सदर ठिकाणी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर केला आहे. तसेच सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे यांचेकडून दि.२२/०४/२०२२ रोजी स्थळ पाहणी केली असता झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल देखील सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी झोपडपट्टी क्षेत्रावर मोजणी नकाशाच्या आधारे त्रिमीती पध्दतीनुसारचे क्षेत्र ओपन स्पेस वगळून ४२८३.५७ चौ.मी. व ओपन स्पेसचे क्षेत्र १२१९२.६१ चौ.मी. असे एकूण क्षेत्र १६४७६.१८ चौ.मी.इतके आहे. नगर विकास विभाग यांचे कडील दि.०७/०६/२०२१ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग -१, पान क्र.२-३ मध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकणाने भाडे पट्टयाने दिलेले व विकसित झालेले भूखंड, सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणाखालील भूखंड व ज्यावर अतिक्रमण झालेले आहे असे भूखंड यांची मालकी व ताबा पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सुपुर्द करण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. त्यानुसार उक्त मिळकतीची मालकी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची नोंद करणे उचित वाटते. सबब, उपरोक्त नमूद मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे;

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र '**झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र**' म्हणून दि.२९/०४/२०२२ रोजीची घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १२-१८ मे २०२२ पृष्ठ क्र. १-२ तसेच दैनिक विश्वेश्वर व दायित्व या

वृत्तपत्रात दि.०३/०५/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.०४/०५/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक पुर्वसूचनेद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले शासकिय विभाग यांना सदर क्षेत्राबाबत कळविणेत आले होते. परंतु याबाबत कोणतेही आक्षेप / हरकत विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले नाहीत.; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ येथे अपील दाखल करता येईल आणि तक्रार निवारण समितीचा अशा अपिलावरील निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

**महानगरपालिका क्षेत्र – पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**
**झोपडपट्टीचे नाव – स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै, सि.स.नं.१३०पै, १३२पै, १३३पै, १३४पै, १३६पै, १३७पै, सेक्टर नं.२९, प्लॉ.क्र.४६ ते ५५, रमाबाईनगर, रावेत.**

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशा वरुन त्रिमीत नुसार आलेले क्षेत्र) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे रावेत | स.नं.१९२पै, १९३पै, १९४पै, सि.स.नं. १३०पै, १३२पै, १३३पै, १३४पै, १३६पै, १३७पै, सेक्टर नं.२९, प्लॉ.क्र.४६ ते ५५, | पिंपरी, चिंचवड महानगरपालिका | ओपन स्पेस वगळून ४२८३.५७ चौ.मी. व ओपन स्पेसचे क्षेत्र १२१९२.६१ चौ.मी. असे एकूण क्षेत्र १६४७६.१८ चौ.मी | पुर्वेस – सि.स.नं.१३४ पै.<br>पश्चिमेस – लागू रस्ता च सि.स.नं.१३७ पै.<br>दक्षिणेस – सि.स.नं.१३३ पै., व १३६पै. व सरंक्षक भिंत<br>उत्तरेस – सि.स.नं.१३२पै.,व १३०पै., व १२९पै. व लागू रस्ता | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

6-7-2022

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :06/07/२०२२

प्रत :- १. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.
२. आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA)- यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३. मा. [redacted] अधिकारी कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर